Dowmloaded from SkillCouncils.com

# जाहीर ई-निविदा (E-Tendering)

## महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, धुळे

## सन - 2024-2025

### लिफाफा क्रमांक - 1

महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत जिल्हा परिषद सेस फंड योजना 10% मबाक निधी अंतर्गत ग्रामीण भागातील मुली व महिलांना व्यवसायिक व तांत्रिक प्रशिक्षण योजने अंतर्गत **संगणक टॅली (TALLY) प्रशिक्षण देणेसाठी** व्यावसायिक प्रशिक्षण प्रदाता (Vocational Training Provider) मान्यताप्राप्त शासनमान्यता प्राप्त संस्थांकडुन जाहीर ई-निविदा (E-Tender) मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | प्रशिक्षणाचा प्रकार | जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लाभार्थ्यांसाठी प्रस्तावित प्रशिक्षणासाठी अंदाजित रक्कम | निविदा फॉर्म फी रुपये | बयाणा रक्कम रुपये | सुरक्षा अनामत रक्कम रुपये (3%) | प्रशिक्षणास पात्र लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | सन 2024-2025 या वित्तीय वर्षात जिल्हा परिषद सेस फंड योजना 10 % मबाक निधी अंतर्गत **संगणक इंग्रजी प्रशिक्षण देणे** | 18,58,000/- | ~~3000/-~~ 5500/- | 90000/- | प्रशिक्षण संस्थेतील पात्र लाभार्थी संख्येच्या एकुण प्रशिक्षण शुल्क (परिक्षा फी समाविष्ट) रकमेच्या 3 टक्के सुरक्षा अनामत रक्कम देयकातुन वसुलपात्र राहील. | ग्रामीण भागातील किमान ई.10 वी उत्तीर्ण व किमान 16 वर्ष वय पूर्ण झालेले मुली व महिला. |

सदर ई-निविदा जाहिरात सविस्तर पणे WWW.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक 14/02/2025 पासुन प्रसिध्द करण्यांत येत आहे.

1. उपरोक्त कामांची निविदा संगणकावर ई-निविदा प्रकिये व्दारे ऑनलाईन करणेत येईल. याबाबत भविष्य काळामध्ये सर्व सुचना तसेच शुध्दी पत्रके या कामी इंटरनेटचे उपयोगाने ऑनलाईन करण्यांत येईल.
2. उपरोक्त कामांबाबतची संपुर्ण माहिती वरील प्रमाणे संकेत स्थळावर उपलब्ध असुन ती वर दिलेल्या कालावधीमध्ये डाऊनलोड करुन घेता येईल.
3. निविदे बाबत आवश्यक बाबी उपरोक्त कागदपत्रे अथवा धनादेश देण्याबाबत मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही. पुर्ण भरलेले तांत्रिक लिफाफे ऑनलाईन पध्दतीने त्याच संकेत स्थळावर जाहिराती मध्ये नमुद केलेल्या दिवशी उघडण्यांत येतील.
4. पात्र निविदाधारकांस वित्तीय लिफाफा क्र.2 तात्काळ उघडण्यांत येईल.कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवणेत आलेला आहे.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)**
**जिल्हा परिषद धुळे**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद धुळे**

क्रमशः

For Consultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCouncils.com

Downloaded from SkillCouncils.com

**लिफाफा क्रमांक - 2**

**प्रपत्र अ**

महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत सन 2024-2025 या वित्तीय वर्षातील जिल्हा परिषद सेस फंड योजना 10% मबाक निधी अंतर्गत मुली व महिलांना व्यवसायिक व तांत्रिक प्रशिक्षण योजने अंतर्गत **संगणक टॅली (TALLY) प्रशिक्षण** देणेसाठी व्यावसायिक प्रशिक्षण प्रदाता (Vocational Training Provider) शासनमान्यता प्राप्त संस्थांकडुन जाहीर ई-निविदा (E-Tender) मागविणेत येत आहे.

**अटी व शर्ती-**

उपरोक्त नमुद प्रशिक्षण देणेसाठी मान्यता प्राप्त संस्थांकडुन ई-निविदा मागविण्यांत येत असुन सोबत जाहिरातीचे विहित नमुन्यातील (BOQ) व प्रस्तावासोबत अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

1) प्रशिक्षण संस्था व्यावसायिक प्रशिक्षण प्रदाता (Vocational Training Provider) (sdis scheme based) शासन मान्यता प्राप्त असावी तसेच त्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडणे बंधनकारक राहील.
2) आपणांस ऑनलाइन ई-निविदा दिनांक 22/02/2025 ठिक 17.30 वाजेपर्यंत भरता येतील. तीन पेक्षा कमी निविदाधारक असल्यांस शा. नि. 1/12/2016 नुसार निविदा फेर प्रसिध्दी बाबत कार्यवाही करणेत येईल.
3) सदर प्रशिक्षणासाठी लाभार्थी हे ग्रामीण भागातील असल्याने निविदाधारक संस्थांनी संबधित तालुक्याचे ठिकाणी **संगणक टॅली (TALLY) प्रशिक्षण** आयोजित करणे आवश्यक आहे.
4) जर निविदाधारकाचे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास (MSME)अधिनियम 2006 अंतर्गत नोंदणी असल्यास तसेच UDYAM अंतर्गत नोंदणीकृत एजन्सी/ पुरवठादार असणे आवश्यक असून तसे एनआयसी कोड सह प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
5) प्रशिक्षण कोर्स www.sdis.gov.in या वेबसाइट नुसार UPSDI0047 **संगणक टॅली (TALLY) प्रशिक्षण** कालावधी 120 तास राहील.
6) सदर **संगणक टॅली (TALLY) प्रशिक्षण** कालावधी 120 तास व प्रशिक्षणाची परिक्षा फी सहित एकुण प्रशिक्षण शुल्क व कालावधी (BOQ) मध्ये नमुद करावा. असे न केलेल्या निविदा फेटाळण्यांत येतील.
7) प्रशिक्षण कार्यारंभ आदेश दिल्यानंतर लगेच प्रवेश प्रक्रिया पुर्ण करुन प्रशिक्षण सुरु करावे लागेल.
8) प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण पुर्ण केल्याबाबत दाखला, निकाल प्रत सादर करणे आवश्यक आहे.
9) प्रशिक्षण संस्था निवडीचा आदेश निर्गमित झाल्यानंतर 8 दिवसांचे आंत आदेशातील अटी व शर्ती नुसार प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी बाबत विहित मुद्रांक शुल्काच्या रक्कम रु.1900/- स्टॅम्प पेपरवर संस्थेने स्वखर्चाने करारनामा करुन देणे आवश्यक आहे.
10) प्रशिक्षणासाठी तालुक्यातील मंजुर पात्र लाभार्थ्यांना निमंत्रित करण्याची व प्रशिक्षण पुर्ण करण्याची जबाबदरी संस्थेची राहील. याबाबत संस्था बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे सहकार्य घेईल.
11) प्रशिक्षण संस्थेस, मंजुर पात्र लाभार्थ्यांनींनी सदरील नमूद कोर्स पूर्ण करणे बंधनकारक राहील अपूर्ण कोर्स राहिल्यास संबधित लाभार्थ्यांचे प्रशिक्षण शुल्क देय ठरणार नाही.
12) **संगणक टॅली (TALLY) प्रशिक्षण** या कोर्स साठी प्रशिक्षणार्थींना एकुण प्रशिक्षण शुल्काच्या 10% रक्कम लाभार्थी हिस्सा संस्थेस भरणे आवश्यक राहील त्याबाबत संस्थेने लाभार्थी हिस्सा जमा पावती रेकॉर्डला ठेवणे आवश्यक आहे.
13) सदर प्रशिक्षण संस्थेस एकुण देयकाच्या 3 टक्के सुरक्षा अनामत रक्कम वजा करुन देयक अदा करणेत येईल याबाबत नोंद घ्यावी. तसेच शासन निर्णया नुसार देयक अदायगी बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. धुळे यांचा निर्णय अंतिम राहील.
14) महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 1 डिसेंबर 2016 अन्वये FALL CLAUSE नियम निविदाधारकास लागू असेल व FORCE MAJEURE CLAUSE नियम निविदाधारकास लागू नसेल.

क्रमशः

For Consultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCouncils.com

Downloaded from SkillCouncils.com



15) ~~निविदा फी रक्कम तसेच बयाणा रक्कम (EMD) RTGS/NEFT नुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांचे नांवे भारतीय स्टेट बँक मुख्य शाखा धुळे मधील खाते क्रमांक 34008976822 मध्ये जमा करावी. धुळे जिल्ह्यातील भारतीय स्टेट बँकेच्या इतर शाखेत सदरची रक्कम जमा केल्यास रु.50/- चे अतिरिक्त शुल्क भरणा करावा. तसेच भरणा केल्याबाबतचे नमुन्यातील प्रमाणपत्र संबधित RTGS/NEFT चा (UTR) क्रमांक नोंदवुन बीड सोबत अपलोड करावा.~~

**निविदा फी रक्कम तसेच बयाणा रक्कम** (EMD) **ऑनलाईन भरणा करावा.**

16) जी छायांकित कागदपत्र अर्जासोबत सादर करण्यांत येतील ती सर्व कागदपत्रे सांक्षाकित असणे बंधनकारक आहे.

17) संस्था किमान तीन वर्षापासुन नोंदणीकृत असावी व प्रस्तावित प्रशिक्षण राबविण्याचा सदर संस्थेस प्रशिक्षण देण्याचा किमान 3 वर्षाचा अनुभव असावा. याकरिता मागील तीन वर्षाचे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी निविदेत अपलोड करावी.

18) संस्थेकडे असलेल्या प्रशिक्षीत मनुष्यबळ यादी व उपलब्ध यंत्रसामुग्रीची यादी संस्थेच्या लेटरहेडवर अपलोड करावी.

19) प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केल्यानंतर संबधित सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र संबधीत प्रशिक्षणार्थ्यांस देणे अनिवार्य आहे.

20) जाहिरातीमध्ये दिलेल्या अटी व शर्ती व्यतीरिक्त काही अतिरिक्त अटी व शर्तींचा समावेश योजना राबविण्याच्या कोणत्याही टप्प्यावर करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. धुळे यांना राहील व त्या अटी व शर्ती संस्थेस बंधनकारक राहतील.

21) संमती पत्रातील सर्व अटी व शर्तींचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील. त्यातील कोणत्याही अटी व शर्तींचा भंग झाल्यांस अथवा संस्थेची मान्यता रद्द झाल्यास अथवा संस्थेने प्रशिक्षण अपुर्ण सोडल्यांस संस्था काळया यादीत टाकण्याबाबतची कारवाईस पात्र राहील.

22) प्रशिक्षणार्थ्यांची सुरक्षिततेची व संरक्षणाची सर्वस्वी जबाबदारी संबधित संस्थेची राहील.

23) निवड झालेल्या संस्थेस योजना राबविण्यासाठी आदेश निर्गमित केल्यानंतर संस्थेने प्रशिक्षणाचा संपुर्ण कालावधी यशस्वीरित्या पुर्ण करणे बंधनकारक राहील. व तसे न केल्यास प्रतिदिन रु.500/- (अक्षरी पांचशे मात्र) प्रमाणे पहिल्या महिन्यात व त्यानंतर प्रशिक्षण कालावधी संपेपर्यंत रु.250/- (अक्षरी दोनशे पन्नास मात्र) प्रतिदिन दंडात्मक कारवाई करण्यांत येवुन संबधीत संस्थेस काळया यादीत टाकण्याची कार्यवाही केली जाईल.

24) योजना राबवितांना काही अपरिहार्य कारणास्तव तांत्रिक अडचणीमुळे अथवा अन्य कारणामुळे प्रशिक्षणाचे देय रक्कमेच्या अदायगीस विलंब झाल्यांस त्यावर कुठल्याही प्रकारे व्याज/विलंब आकार संबधीत संस्था मागणी करणार नाही. तसेच याबाबत न्यायालयाकडेस दाद मागता येणार नाही.

25) प्रशिक्षणाचा पुरवठा आदेश निधीच्या उपलब्धते नुसार देण्यांत येईल.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती निविदाधारकांस बंधनकारक आहेत. तथापि त्या संस्थेच्या निविदेचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)
जिल्हा परिषद धुळे

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद धुळे

For Consultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCouncils.com

Downloaded from SkillCouncils.com

## लिफाफा क्र. 2 दरांबाबतचा लिफाफा

निविदे सोबत देण्यांत आलेले BOQ FILE मध्येच दर भरुन वेब साईटवर अपलोड करावेत.

**ई-निविदेच्या अटी व शर्ती**

1. सशर्त निविदा विचारात घेतली जाणार नाही.
2. निविदा धारकाने नमुद दरामध्ये दिनांक 1 जुलै, 2017 पासुन लागु झालेल्या वस्तु व सेवा कर कायदा (जीएसटी) इतर प्रचलित कर, शुल्क आणि वाहतुक खर्च या सर्व करांसहित प्रशिक्षणाचे / वस्तुचे दर (किंमत) प्रति नग/प्रति प्रशिक्षणार्थी या दराने नमूद करावी.
3. निविदा धारकाने प्रशिक्षणाचे दर नमुद करतांना 120 तास प्रती लाभार्थी याप्रमाणे GST सह दर नमूद करणे आवशयक आहे.
4. निविदा धारकाने सादर केलेले दर हे निविदा स्विकृतीच्या दिनांका पासुन 180 दिवसांपर्यंत बंधनकारक राहतील.
5. नामंजुर ई-निविदा बाबत कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
6. निविदेतील बाबीं प्रसिध्द करणेंत आलेले विनिर्देशा नुसार शासन दर करार अस्तित्वात आल्यांस किंवा शासनाने खरेदी धोरणात काही बदल केल्यांस किंवा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेचे ठरविल्यांस असे अधिकार राखुन ठेवण्यांत आले आहेत.
7. जिल्हा परिषदेस आवश्यकता वाटल्यास उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे कडील शासन निर्णय दिनांक 1 डिसेंबर, 2016 मधील नियम क्र. 3.3.2 नुसार पुनप्रर्त्यंयी आदेशाची कार्यवाही करणेंत येईल.
8. राज्य शासन व केंद्र शासन किंवा जिल्हा परिषेदेशी संबधित असणा-या व्यक्तीस निविदा भारता येणार नाही.
9. अनुदानाच्या उपलब्धतेनुसार प्रस्तावित प्रशिक्षण आदेश आदेश निर्गमित करण्यात येईल.
10. निविदा प्रक्रियेत पुरवठा आदेश मिळणेस पात्र ठरलेल्या निविदाधारकाने विहित रकमेचा मुद्रांक पेपरवर निविदा प्रक्रियेतील तसेच पुरवठा आदेशातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत विहित रकमेच्या मुद्रांकावर स्वखर्चाने करारनामा करून देणे बंधनकारक आहे.
11. निविदा कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्याचे अथवा अटी शिथिल करण्याचे अथवा प्रस्तुत निविदेबाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकार म.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धुळे यांनी राखून ठेवले आहेत.
12. ज्या निविदा धारकांची निविदा स्विकृत केली जाईल त्या निविदाधारकाने साहित्य एकुण पुरवठा करावयाच्या रकमेच्या 3% सुरक्षा अनामत रक्कम असेल, सदर रक्कम अनामत म्हणून एकूण देय रक्कमेच्या देयकातून वजा करण्यात येवून योजेनेचे लेखापरीक्षण होईपावेतो विभागाकडे जमा राहील.या रक्कमेवर कोणतेही व्याज देय राहणार नाही.

वरील लिफाफा क्रमांक – 1, लिफाफा क्रमांक – 2, प्रपत्र - अ, प्रपत्र – ब व लिफाफा क्रमांक – 3 मध्ये नमूद केलेल्या कागद पत्रांवर पृष्ठ क्रमांकांसहित संक्षांकित प्रती PDF Format मध्ये स्कॅन करून त्या अपलोड करणे आवश्यक राहील.

वरील लिफाफा क्रमांक – 1, लिफाफा क्रमांक – 2, प्रपत्र - अ, प्रपत्र – ब व लिफाफा क्रमांक – 3 मध्ये नमूद केलेल्या कागदपत्र तसेच निविदा फी व बयाणा रकमेबाबतची पूर्तता होत नसल्यास निविदा वैध ठरविली जाणार नाही. व त्या नविदाधारकाचा दरांबाबतचा लिफाफा उघडण्यात येणार नाही.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)**
**जिल्हा परिषद धुळे**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद धुळे**

For Consultation, please call at 9630030343 or visit at www.SkillCouncils.com